खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २८९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.३१ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# विषारी दारुमुळे पुण्यात मृत्यूंची मालिका; तुकाराम मुंढेंनी भेसळीची पाळेमुळे खणून काढली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, पुणे :** पुण्यासह पिंपरी चिंचवड शहरात मिथेनॉल मिश्रित विषारी गावठी दारू प्यायल्यामुळे मागील दोन दिवसांत तब्बल २२ जणांना आपला जीव गमवावा लागला. या गंभीर घटनेनं राज्यभरात खळबळ उडालेली असतानाच राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने या घटनेची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर भिवंडीत कारवाई करण्यात आली असून मिथेनॉलचा मोठा साठा जप्त करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे आणि परिसरात अनेकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरणारी विषारी दारू ज्या केमिकलच्या साहाय्याने बनवण्यात आली होती, त्या केमिकलचा मोठा साठा भिवंडीत असल्याचं तपासात समोर आलं होतं. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने तात्काळ भिवंडीतील 'मे. रेक्स इंटरनॅशनल' कंपनीच्या गोडाऊनवर छापा टाकला. या छाप्यात प्रशासनाकडून जवळपास ५ हजार ९२९ किलोग्रॅम इतका इथेनॉलचा प्रचंड मोठा साठा जप्त केला गेला. पुण्यात जी विषारी दारू विकण्यात आली ती बनवण्यासाठीचे मुख्य रसायन याच कंपनीकडून पुरवण्यात आलं होतं, अशी माहिती आहे. त्यामुळे हा साठा अन्न व औषध प्रशासनाने जप्त केल्याने समाधान व्यक्त केलं जात आहे.

**पुण्यात नेमकं काय घडलं?**

पुणे जिल्ह्यातील दापोडी परिसरातील एका हातभट्टी अड्ड्यावर मंगळवारी रात्री व बुधवारी सकाळी नागरिकांनी गावठी दारू प्यायली. ही दारू प्यायल्यानंतर संबंधित लोकांना डोळ्यांची जळजळ, चक्कर येणे, अंधारी येणे, श्वसनास त्रास, छातीत दुखणे व तोंडातून फेस येणे अशी लक्षणे जाणवू लागली. यामुळे काहींची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. परंतु रुग्णालयात पोहोचण्याआधीच काही जणांना आपले प्राण गमवावे लागले. आतापर्यंत २२ जणांचा मृत्यू झाला असून अजूनही काही जणांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**तुकाराम मुंढेंच्या एंट्रीनंतर FDA च्या कारवाईला वेग**

तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भ्रामक; तसेच दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करणे आणि अवैध औषध उत्पादन व विक्रीविरुद्ध कारवाई करण्याची धडक मोहीम अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) हाती घेतली आहे. याअंतर्गत आक्षेपार्ह जाहिराती असलेला ७३ लाख २४ हजार ६५६ रुपये किमतीचा औषधसाठा राज्यभरातून जप्त करण्यात आला आहे; तसेच सात जिल्ह्यांतील १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती 'एफडीए'च्या वतीने देण्यात आली आहे. मुंबई, पुणे, नागपूर, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, पुणे येथे मे. दिव्या फार्मसी यांच्या उत्पादनाच्या औषधांचा साठा जप्त करण्यात आला असून हरिद्वार (उत्तराखंड) येथे मे. दिव्या फार्मसीच्या औषधांचा सात लाख २६ हजार ७५५ रुपये, नाशिक येथे सात लाख १० हजार ९४५, पुणे येथे १४ लाख ६८ हजार ९८१, मुंबई येथे एक लाख ८५ हजार ६००, कोकण विभागात १८ लाख ५८ हजार, अमरावती येथे एक लाख ४२ हजार २२९, छत्रपती संभाजीनगर येथे ४८ हजार ७१८ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. पुण्यात दोन ॲलोपॅथीसदृश औषधांचा २१ लाख ४२८ रुपयांचा साठा ताब्यात घेण्यात आला.



# मीरा-भाईंदर शहरात पुन्हा एकदा मराठी माणसाची गळचेपी?

## मराठी असल्याकारणाने घर देण्यास नाकारणाऱ्या मालकाला मंत्री सरनाईकांनी सुनावले खडे बोल!

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.३०, भाईंदर :** मुंबई आणि महाराष्ट्रात राहायचं असेल तर मराठी माणसाचा सन्मान राखावाच लागेल हाच बाणा पुन्हा एकदा दाखवून देत मीरा भाईंदरमध्ये घडलेल्या एका संतापजनक घटनेविरोधात महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री आणि मीरा-भाईंदर लोकप्रतिनिधी मा.ना.श्री. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी आक्रमक पवित्र घेतला आहे. स्वतःच्या कष्टाने आणि स्वाभिमानाने 'शिंदे गुळाचा चहा आणि नाश्ता सेंटर' चालवून कुटुंबाचा आधार बनलेल्या मराठी भगिनी सौ. रविना शिंदे यांना 'तू मराठी आहेस' म्हणून घर नाकारण्याची धक्कादायक घटना भाईंदरमध्ये घडली. या घटनेची माहिती मिळताच लोकप्रतिनिधी या नात्याने मंत्री प्रताप सरनाईक यांनी रविना यांच्या स्टॉलला भेट देऊन तिच्या हातचा चहा पिला आणि संपूर्ण प्रकरणाची माहिती जाणून घेतली आणि शिंदे कुटुंबाला धीर दिला. एवढेच नव्हे तर मराठी माणसाचा अपमान करणाऱ्या त्या संबंधित घरमालकाला तत्काळ घटनास्थळी बोलावून घेत मंत्री सरनाईक यांनी अत्यंत कठोर शब्दात त्यांची कानउघडणी केली आणि त्याला कायदेशीर परिणामांची जाणीव करून दिली.

**पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे आदेश; कायदेशीर कारवाईचा बडगा**

या संतापजनक प्रकाराची केवळ दखल न घेता, मंत्री सरनाईक यांनी या प्रकरणी दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे पाऊल उचलले आहे. संबंधित घरमालकाविरोधात पोलीस ठाण्यात अधिकृत गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांना तातडीने पत्र देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी माणसाच्या स्वाभिमानाशी आणि हक्काशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.



**बिल्डर, गुंड आणि दादागिरी करणाऱ्यांना कडक इशारा**

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक कमालीचे आक्रमक झाले होते. त्यांनी स्पष्ट शब्दांत बजावले की, महाराष्ट्राच्या मातीत राहून मराठी माणसाचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न कोणीही करू नये. जर कोणी चुकीच्या पद्धतीने दादागिरी, दंडुकेशाही किंवा गुंडगिरी करत असेल, तर त्याला शिवसेनेच्या स्टाईलने उत्तर दिले जाईल. यापुढे कोणत्याही मराठी माणसाला घर नाकारले गेल्याचे समोर आले, तर तिथे जाऊन थेट जाब विचारा, अशा कडक सूचना मी सर्व पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# शहापूर तालुक्यातील दापूरमाळमध्ये भीषण पाणीटंचाई

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.३०, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील डोंगरकुशीत वसलेले दापूर माळ हे छोटेसे गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. पिण्याच्या पाण्याची कोणतीही कायमस्वरूपी सोय नसल्यामुळे येथील सुमारे अडीचशे ते तीनशे ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, गावाच्या जवळच मध्यवैतरणा धरण असतानाही ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः संघर्ष करावा लागत आहे. महिलांना दररोज दीड ते दोन किलोमीटरचा खडतर डोंगर दरड चढून, डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत आहे. भर उन्हात ही जीवघेणी पायपीट त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनली आहे.

घरात चूल पेटवायची असेल, तर आधी डोक्यावर हंडा घेऊन डोंगर उतरावा लागतो, अशी हळहळ गावातील महिलांनी व्यक्त केली. एका हंडाभर पाण्यासाठी तासन्तास मेहनत घ्यावी लागत असल्याने महिलांवर मोठा शारीरिक व मानसिक ताण निर्माण झाला आहे.

या परिस्थितीचा फटका लहान मुलींनाही बसत असून, अनेक मुलींना शाळा सोडून आईसोबत पाणी आणण्यासाठी जावे लागत आहे. यामुळे त्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे. गावात पक्का रस्ता नसल्यामुळे आजारी व्यक्तींना उपचारासाठी नेणेही अत्यंत कठीण बनले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

**प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची गरज :** ग्रामस्थांची मागणी आहे की, दापूर माळ येथे तातडीने पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करण्यात यावी तसेच रस्त्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. अन्यथा, येणाऱ्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# निंबर्गीत लहान भावाने केला मोठ्या भावाचा खून

## दळणाच्या जात्याचा दगड डोक्यात घालून संपवले

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.३०, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी येथे पंधरा दिवसाखाली कुऱ्हाडीने वार करून जखमी केलेल्या मोठ्या भावाचा लहान भावाने शनिवार पहाटे साडेचार वाजता झोपेत असताना जात्याच्या दगडाने डोके ठेचून त्याचा निर्घृणपणे खून केला.



रेवणसिध्द उर्फ महांतेश सूर्यकांत ऐवळे (वय ४५) राहणार निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) असे खून झालेल्याचे नाव आहे. या खून प्रकरणी आरोपी लहान भाऊ संतोष सूर्यकांत ऐवळे (वय ३६) राहणार निंबर्गी याला मंद्रुप पोलिसांनी पळून जाण्याच्या तयारीत असताना अटक केली. मंद्रुप पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, आरोपी संतोष ऐवळे व त्याचा भाऊ मयत रेवणसिध्द या दोघांना दारूचे व्यसन होते. गेल्या १५ दिवसा खाली दोघांमध्ये भांडण झाले होते. त्यावेळी रेवणसिध्द याने संतोष याला कुऱ्हाडीने मारुन जखमी केले होते. त्यामध्ये त्याच्या छातीला व पोटाला जखमा झाल्याने टाक्या पडल्या होत्या. उपचारानंतर तो घरी आला होता.

शनिवारी रात्री नऊ वाजता पत्नी माहेरी रेवणसिध्द याने भाजी केली. जेवण करीत असताना भाजी चांगली झाली म्हणून आरोपी संतोष याने ती भाजी आईच्या अंगावर फेकली. यावरून पुन्हा दोन्ही भावांमध्ये वाद झाला. यामुळे आई वडील शेजारील मल्लिकार्जुन गेजगे यांच्या घरी झोपण्यास गेले. तर दोघे भाऊ घरासमोरच झोपले. पहाटे साडेचार वाजता झालेले भांडणाच्या रागात झोपलेल्या रेवणसिध्द याच्या डोक्यात जात्याचा दगडी पाटा घातला. डोके व तोंडावर जबर मार लागल्याने गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. ऐवळे कुटुंब राहत असलेल्या इंदिरानगर परिसरात खून झाल्याचे समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

या घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, हवालदार शहानुर मुलाणी यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी मंद्रूपच्या ग्रामीण रुग्णालयात पाठविला. तसेच खुनातील संशयित आरोपी संतोष ऐवळे याला ताब्यात घेऊन अटक केली आहे. या प्रकरणी दिपाली ऐवळे हिने पोलिसात फिर्याद दिली आहे. अधिक तपास मंद्रुप पोलीस करीत आहेत.

# कोराडी औष्णिक वीज केंद्रात कंत्राटदारांची दादागिरी!

## स्थानिक विरुद्ध बाहेरील 'कंत्राटदार' वादामुळे वातावरण तापले

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** कोराडी औष्णिक वीज केंद्र येथे स्थानिक विरुद्ध बाहेरील कंत्राटदार असा वाद उफाळून आला असून परिसरातील वातावरण प्रचंड तापले आहे. सीएसआर फंडांतर्गत निघालेल्या २२ कोटी रुपयांच्या सिव्हिल (स्थापत्य विभाग) कामांच्या निविदा प्रक्रियेत कोराडी औष्णिक वीज केंद्रात कार्यरत स्थानिक कंत्राटदारांनाच काम देण्याची जाचक अट घालण्यात आल्याने निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून राजकीय नेत्यांच्या दबावाखाली अधिकाऱ्यांनी नियम डावलल्याचा गंभीर आरोप होत आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दोन दिवसांपूर्वी कोराडी औष्णिक वीज केंद्रात २२ कोटी रुपयांच्या कामांच्या निविदा निघाल्या होत्या. यामध्ये खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कार्यरत असलेले काही प्रशिक्षित कंत्राटदार केवळ १० लाख रुपयांच्या एका छोट्या कामाची निविदा भरण्यासाठी गेले होते. मात्र, या निविदा प्रक्रियेत सदर काम फक्त कोराडी येथील स्थानिक कंत्राटदारांनाच मिळेल अशी विशिष्ट आणि जाचक अट टाकण्यात आल्याचे समोर आले.

खापरखेडा येथील कंत्राटदारांनी या जाचक अटीवर चर्चा करण्यासाठी कोराडीच्या मुख्य अभियंत्यांची भेट मागितली होती. मात्र, खापरखेडाचे कंत्राटदार मुख्य अभियंत्यांना भेटायला येणार असल्याची गोपनीय माहिती कोराडीतीलच एका अधिकाऱ्याने स्थानिक कंत्राटदारांना माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. माहिती मिळताच कोराडीतील स्थानिक कंत्राटदारांनी खापरखेडाच्या कंत्राटदारांना घेराव करून तुम्ही फक्त खापरखेड्यात काम करायचे कोराडीत पाऊल ठेवायचे नाही. तुम्हाला येथे एकही काम मिळणार नाही असे धमकावत त्यांनी अर्वाच्च भाषेत शिवीगाळ सुरू केली. परिस्थिती इतकी चिघळली होती की काही कंत्राटदारांनी गाड्या फोडण्यासाठी हातात दगड उचलले तर काहींनी अंगावरील कपडे काढून अश्लील पद्धतीने विरोध प्रदर्शन करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

या अन्यायाविरुद्ध खापरखेडाच्या कंत्राटदारांनीही तीव्र संताप व्यक्त केला आहे. खापरखेडा वीज केंद्रांतर्गत निघणारी बहुतांश मोठी कामे कोराडीतीलच कंत्राटदार करीत आहेत. त्यामुळे खापरखेडाच्या स्थानिक कंत्राटदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कार्यरत कंत्राटदार स्थानिक प्रशासनाकडे कामाची मागणी करतात तेव्हा अधिकारी 'बजेट नाही' असे खोटे कारण सांगून त्यांची दिशाभूल करतात, असा थेट आरोप कंत्राटदारांनी केला आहे.

जर कोराडीत खापरखेडाच्या कंत्राटदारांना बंदी घातली जात असेल तर यापुढे कोराडीच्या एकाही कंत्राटदाराला खापरखेड्यात पाऊल ठेवू देणार नाही आणि काम करू देणार नाही असा कडक इशारा खापरखेडाच्या कंत्राटदारांनी दिला असून या घटनेचा जाहीर निषेध केला आहे.

महानिर्मितीच्या नियमांना हरताळ फासून केवळ राजकीय दबावापोटी कोराडीत विशिष्ट कंत्राटदारांची मक्तेदारी निर्माण केली जात असल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत आहे. अधिकाऱ्यांच्या अशा पक्षपाती भूमिकेमुळे ऊर्जा प्रकल्पांमधील अंतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेला मोठा धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी ऊर्जामंत्री आणि वरिष्ठ प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषी अधिकाऱ्यांवर व गुंडगिरी करणाऱ्या कंत्राटदारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. यासंदर्भात खापरखेडा येथे कंत्राटदार संघटनेची बैठक ३० में शनिवारला पार पडली. यावेळी जाहीर निषेध करण्यात आला असून यापुढे कोराडी औष्णिक वीज केंद्र परिसरातील कंत्राटदारांना खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात पाय ठेऊ देणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतला आहे.




## क्लबांच्या मरणकळा!

सुमारे १८ वर्षांपूर्वी एकदा शास्त्री भवनासमोरील चेम्सफोर्ड क्लबमध्ये जाणं झालं. हाकेच्या अंतरावरील त्या क्लबमध्ये गेल्यावर स्वागत कक्षावरच्या त्या सुंदरीनं, 'येस्स?' असं विचारताना असा विलक्षण तुच्छतेचा कटाक्ष टाकला की खिशातल्या संसदेच्या पीआयबीच्या वगैरे कार्डांचा अभिमान क्षणात जमीनदोस्त झाला हे आठवण्याचं कारण म्हणजे दिल्ली जिमखाना आणि रेसकोर्स या उच्चभ्रू क्लबांवर केंद्र सरकारनं उगारलेल्या बडग्यामुळं उडणारा वादांचा धुरळा. संदर्भ दिल्लीचा असला तरी साहेबाचं पाऊल ज्या ज्या महानगरात पडलं तिथं हे असे क्लबरूपी पांढरे हत्ती उभे आहेतच. मुंबईच्या 'ब्रीच कँडी क्लब'च्या वंशद्वेषी सदस्यत्व धोरणाचा फटका आपल्यालाही बसला होता, अशी आठवण खासदार शशी थरूर यांनी नुकतीच सांगितली.

असं म्हणतात की, एक दिल्ली काळजात किमान दोन राजधान्या वागवीत असते. पहिल्या राजधानीत संसद, सर्वोच्च न्यायालय, मंत्रालय, पत्रकार परिषदांचा कोलाहल. दुसऱ्या राजधानीत विस्तीर्ण आवारात पॉश कपड्यांतले, हिरवळीवर फिरणारे साहेब. संध्याकाळी तिथं खणखणणारे पेले मधुशाला कविता जणू जिवंत करतात. बिलियर्ड्स टेबलाभोवतीचे गंभीर चेहरे, टेनिस कोर्टांवर बागडणारे बाप्ये आणि दरवाजावर 'मेंबर्स ओन्ली'चा सभ्य; पण उद्धट फलक. मुळात दिल्लीतला असा क्लब म्हणजे फक्त क्लब नसतो; ती एक वर्ग-वर्णाच्या अहंकाराची मानसिकता असते. दिल्लीतली क्लब संस्कृती म्हणजे 'उच्चभ्रू संस्थानिकां'चे जणू अड्डेच. दिल्ली जिमखाना, चेम्सफोर्ड, रोशनआरा, दिल्ली गोल्फ, कॉन्स्टिट्यूशन, रेसकोर्स वगैरे ही भारतीय अभिजनवादाची स्मारकं आहेत. आधी गोरा साहेब स्कॉच पित होता, आता भारतीय साहेब काय काय पितो इतकाच काय तो फरक. साहेब जाऊन आता ऐंशी वर्षं झाली, पण या क्लबांमधलं अंतर्गत राजकारण फारसं बदललेलं नाही. इंग्रज गेले, पण त्यांची क्लब संस्कृती भारतीय सत्ताधाऱ्यांनी प्रेमानं उचलून घेतली. 'इम्पिरियल' शब्द गेला, पण इम्पिरियलपणा कायम राहिला.

आजही दिल्लीतल्या अनेक क्लबांचं सदस्यत्व मिळणं म्हणजे ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळण्याइतकं कठीण. कोणाचे वडील सचिव होते-आहेत, कोणाचे काका-मामा न्यायाधीश, कोणी मेजर, जनरल होते, कोणी कुठले संस्थानिक हीच इथल्या सदस्यत्वाची खरी पात्रता. जातऐवजी 'नेटवर्क' हा शब्द वापरणाऱ्या या क्लबांमध्ये अजूनही सरंजामी शिष्टाचाराचा जीव अडकला आहे. 'नो चप्पल', 'जॅकेट हवंच', 'कॉलरशिवाय प्रवेश नाही' अशा नियमांमधून वर्गभेदाचाच चेहरा दिसतो.

२- सफदरजंग रोडवर २७.३ एकरांवर पसरलेला, २ जुलै १९१३ रोजी ब्रिटिशांनी स्थापलेला दिल्ली जिमखाना क्लब हेही या संस्कृतीचं मोठं प्रतीक. इथं खरा मामला संपर्कांचा -नेटवर्किंगचा असतो. निवृत्त सचिव, मंत्री, संपादक, नामांकित कायदेतज्ज्ञ, उद्योगपती, धोरणकर्ते वगैरे, तारांकित हॉटेलांत नको म्हणून इथंही भेटतात. देशात कोणाचं काय होणार याचे अंदाज वाइन आणि कढई चिकन, चिकन टिक्का यांबरोबर बांधले जातात. सरकारनं करार संपल्याचं सांगत जागा रिकामी करण्याची नोटीस या क्बबला दिली. 'राष्ट्रीय सुरक्षा' आणि 'सार्वजनिक उपयोग' ही कारणं देण्यात आली. क्लबनं लगेच दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. मुळात हा वाद फक्त जमिनीचा नाही; जुनी अभिजन व्यवस्था आणि नवी राजकीय सत्ता यांच्यातला तो कुस्तीचा फडच आहे. 'परंपरा वाचवा' असं क्लबचं म्हणणं, तर 'कोणती परंपरा?' असा सरकारचा सवाल. जिमखाना क्लबवर कोट्यवधींची थकबाकी आहे. ज्या देशात सामान्य माणूस घराच्या ईएमआयमध्ये अडकलेला आहे, जिथं उद्या सकाळी पेट्रोल-डिझेलची महागाई आणखी किती उग्र होईल या चिंतेत रात्रीचा डोळा लागणं अवघड झालंय, तिथं असे काही क्लब शेकडो कोटींच्या सरकारी जमिनीवर सुशेगाद कसे दिसतात? मात्र, 'सार्वजनिक उपयोग' या सरकारच्या कारणाच्या आडून नवी व्हीआयपी संस्कृती उभी राहण्याची भीतीही खरीच. रोशनआरा क्लबची कथा आणखी भन्नाट. लीज संपल्याचं कारण देत दिल्ली विकास प्राधिकरणानं हा क्लब सील केला. सदस्यांनी 'मौलिक अधिकार' धोक्यात आल्याचा युक्तिवाद केला; न्यायालयानं तो फेटाळला.

**- मंगेश वैशंपायन**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर!

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली.

मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती.

त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच



अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# रिल लाईफ आणि रियल लाईफ

सोशल मीडियामुळे अनेकांना नेता, अभिनेता, अभिनेत्री, डान्सर, गायक, लेखक, चित्रकार बनता आले. सुरुवातीला केलेली छोटीशी कृती सोशल मीडियावर प्रदर्शित करून मिळालेली वाहवा पुढे जाऊन आपला छंद कधी बनली, हे अनेक डिजिटल क्रिएटर्सच्या लक्षातही आले नाही. स्वतःमधील सुप्त गुण जगासमोर प्रदर्शित करण्याची जणू माणसांमध्ये एक प्रकारची आंतरिक सदिच्छाच असते.

सोशल मीडियापूर्वी फार थोड्यांना स्वतःला प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ मिळत होते. परंतु आता काहींनी सोशल मीडियालाच आपला व्यवसाय म्हणून स्वीकारला आहे. काहींनी स्वतःच्या कौशल्याचे रील्स प्रदर्शित करून तुफान लोकप्रियता मिळवली. परंतु काही जणांच्या बाबतीत मात्र एक शेर उलट पद्धतीने लिहावा लागेतो ˋ



**खाली हंगामा खडा करना**
**हमारा मकसद है,**
**हमें ये सूरत बदलनी नहीं है!**

हे अगदी खरे आहे की अनेक रील स्टार्सच्या रियल लाईफ आणि रिल लाईफमध्ये मोठी विसंगती असते.स्वतःचे खरे रूप दाखवणे अनेकदा अशक्य असते; पण खोट्या गोष्टीचे चित्र लोकांसमोर 'रील'च्या माध्यमातून प्रदर्शित केले जाते.

अनेक रील स्टार्सनी आपल्या संवादफेकीच्या शैलीमुळे लोकांना वेड लावले आहे. त्यांचा आत्मविश्वास खरंच वाखाणण्याजोगा असतो. समोरच्या व्यक्तीच्या मनाचा ठाव घेण्याची कला त्यांनी अवगत केली आहे. त्यांचे बोलणे, वागणे, चालणे आणि आपले मत ठामपणे मांडण्याची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण असते.सिनेमातील अभिनेता-अभिनेत्री होण्याचे स्वप्न अनेकांनी रील्स बनवून, छोट्या स्वरूपात का होईना, पूर्ण केले आहे.

रील्स पाहणारा वर्ग मोठ्या प्रमाणात 'जनरेशन झेड' आणि 'जनरेशन अल्फा'चा आहे. त्यांचा अटेंशन स्पॅन अत्यंत कमी असतो. जे सर्वोत्तम, मनाला भावणारे आणि दर्जेदार असते, तेच पंधरा सेकंदांपेक्षा जास्त वेळ पाहिले जाते. अन्यथा, पहिल्या दहा सेकंदांतच तर्जनीच्या एका झटक्याने ते नजरेआड केले जाते. काय बोर करतोय! किंवा काय बोर करतेय! असा शेरा मारून त्या रीलला नाकारले जाते. जीवनाला कलाटणी देणारा संदेश देणारे किंवा माहितीपूर्ण रील्सदेखील अनेकदा झिडकारले जातात. मात्र केवळ मनोरंजन, हास्यविनोद आणि टुकारपणा करणाऱ्या रील स्टार्सची सध्या चांदी आहे. दुसऱ्याचे वस्त्रहरण करणाऱ्या किंवा अपमानास्पद विनोद करणाऱ्या रील स्टार्सना अधिक मागणी मिळत आहे.

हवेत दम देत, अदृश्य शत्रूंना आव्हान देत, स्वतःच्या दंडात ताकद नसतानाही चुटक्या वाजवत दमबाजी करणारे अनेक रील स्टार्स काही तरुणांचे आयडॉल बनले आहेत.

रिल लाईफ आणि रियल लाईफ यामध्ये फार मोठी दरी आहे, हे हळूहळू अनेकांच्या लक्षात येत आहे. काहींना तर खडकन रिल लाईफमधून रियल लाईफमध्ये आणावे लागत आहे.रियल लाईफ ही प्रामाणिक प्रयत्नांनी मिळणाऱ्या यशावर समृद्ध होते. रिल लाईफ ही झटपट प्रसिद्धी, श्रीमंती आणि हवेत तरंगण्याच्या मानसिकतेवर आधारलेली असते. रियल लाईफ ही सातत्यपूर्ण मेहनत करणाऱ्या, सन्मार्गाने जगणाऱ्या आणि यशाची हवा डोक्यात जाऊ न देणाऱ्यांची असते. म्हणूनच, रिल लाईफमध्ये अडकलेल्या लोकांना हळुवारपणे रियल लाईफकडे घेऊन जाण्याची गरज आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## कचरा सम्राट

कचरासमस्या तीचं
जीव गेला कंटाळून
सफाईकरा इतरांनी
बसेकसे कवटाळून

पाऊस उभा दारात
बसलायं खोळंबून
स्वागता तुडुंब नाला
दुरावस्थेत खंगाळून

संकटेसंकटा मागून
येतचंराहणार लपून
नाले गटारी सफाई
निवांत सुस्त झोपून

किती लढे कामगार
मनस्वीताणा थकून
चिंताग्रस्त सरकारी
शक्तीयुक्ती ये कुठून

कचरासम्राट आम्ही
नाले टाकतो तुंबून
सहयोगनसे कसला
गंमत पाहतो लांबून

ए आय तंत्रज्ञान नवे
का जायचे भांबावून
शोधता उपायसापडे
भरारी घेतो झेपावून

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# मौल्यवान जीवनापेक्षा शरीर पोकळणाऱ्या व्यसनाधीनतेला महत्त्व?

तंबाखू हे आपल्या आजूबाजूला सहज उपलब्ध असलेले विष आहे. त्याच्या संभाव्यतेबद्दल, त्यामुळे होऊ शकणाऱ्या जीवघेण्या आजारांबद्दल आणि धोक्यांबद्दल आपणा सर्वांनाच चांगली जाणीव आहे. आपण टीव्ही, वर्तमानपत्रे आणि सोशल मीडियावर तंबाखूविषयी जनजागृतीच्या जाहिराती पाहतो. निरक्षरांपासून ते उच्चशिक्षितांपर्यंत, सर्व वयोगटातील लोकांना त्याच्या दुष्परिणामांची साधारणपणे जाणीव आहे, पण ते, ही गोष्ट गांभीर्याने घेत नाहीत. हीच आपल्या समाजासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. अगदी लहान शाळकरी मुलेही आपल्या डोळ्यांदेखत तंबाखू खातांना दिसतात. चौकात, पानटपरीवर प्रतिष्ठित घराण्यातील मुली आणि नामांकित शाळांमधील विद्यार्थीदेखील सिगारेट ओढताना दिसतात. मोठ्या शहरात तर फॅशनच्या नावाखाली सर्रास उघडपणे व्यसन करतात. गावांमध्ये आणि शहरांमध्येही तंबाखू वापरणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. तंबाखू आणि सिगारेटच्या पाकिटांवर धोक्याच्या सूचना दिलेल्या असतात, त्या वाचून आणि होणाऱ्या जीवघेण्या आजारांची चित्रे कशी समजून घ्यायची हे ही सर्वांना माहीत असते, पण त्या माहितीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. या वर्षी जागतिक तंबाखू विरोधी दिन २०२६ ची संकल्पना आकर्षणाचा पर्दाफाश



- निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाशी लढा ही आहे.

लोकांनी व्यसनाबद्दल असे गैरसमज निर्माण केले आहेत की, जणू त्यांचे आयुष्यच त्यासाठी समर्पित आहे. काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांची पचनक्रिया सुधारते, काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांना चांगली झोप लागते, काही म्हणतात की तंबाखू ओढल्याने त्यांना कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. ते तंबाखू ओढायला सुरुवात करतात आणि मग त्याचे व्यसनात रूपांतर करतात. हळूहळू, तंबाखू शरीराला कमजोर करू लागतो, त्याचे अवयव पोखरतो आणि त्यांना महागड्या, असाध्य रोगांच्या उंबरठ्यावर आणून ठेवतो. आपण आपली सगळी संपत्ती खर्च केली तरी, मृत्यूला जीवनात बदलू शकत नाही. मग आपले व्यसन भागवण्यासाठी आपण हे मौल्यवान आयुष्य जीवघेण्या आजारांना का बळी देतो? इतरांना देखाव्याच्या इच्छेपोटी आणि पालकांच्या नियंत्रणाच्या अभावामुळे किशोरवयीन आणि तरुण पिढी तंबाखू, सिगारेट आणि हुक्का ओढायला सुरुवात करते. आधुनिकतेच्या या भ्रमात, शहरांमध्ये हुक्का पार्लरचे एक नवीन साम्राज्य फोफावत आहे, जे तरुणांच्या व्यसनाला खतपाणी घालत आहे.

तंबाखूचे सेवन विविध प्रकारे केले जाते, जसे : बिडी, सिगारेट, हाताने गुंडाळलेली सिगारेट, पाईप, सिगार, हुक्का, पाण्याचा पाइप, चुट्टा, धुमटी आणि चिल्लम. शिवाय, तंबाखू-आधारित पान, खैनी, गुटखा, खर्रा आणि तंबाखू पान मसाला देखील वापरला जातो. मिश्री, गुल, बज्जर, गुडाखू इत्यादी तंबाखूजन्य पदार्थ दातांना आणि हिरड्यांना लावले जातात आणि नस्य हुंगले जाते. भारतात तंबाखूच्या सेवनामुळे दररोज अंदाजे ३,५०० मृत्यू होतात. भारतात १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे २६.७ कोटी लोक तंबाखूचे सेवन करतात. २०११ मध्ये, ३५ ते ६९ वयोगटातील लोकांसाठी तंबाखू सेवनाचा आर्थिक खर्च १,०४,५०० कोटी रुपये होता.

पान ३ वर...

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

पान २ वरून...

## मौल्यवान जीवनापेक्षा शरीर पोकळणाऱ्या व्यसनाधीनतेला महत्त्व?

जेव्हा एखादी व्यक्ती स्वतः धूम्रपान करत नाही, परंतु दुसऱ्याद्वारे केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येते आणि ऑक्सिजनसह तो धूर शरीरात श्वासावाटे आत घेते, तेव्हा ती व्यक्ती 'सेकंड-हँड स्मोकर' असते. आपल्या घरात किंवा घराच्या आसपास कोणीही धूम्रपान करत असल्याचे आपण अनेकदा पाहतो, ज्याचा धूर संपूर्ण घरात पसरतो आणि घरातील इतर सदस्यही त्या धुराचे बळी ठरतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जे तंबाखूचे सेवन सोडत नाहीत, त्यांपैकी निम्म्याहून अधिक लोकांचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. तंबाखूमुळे दरवर्षी ७० लाखाहून अधिक लोकांचा मृत्यू होतो; यापैकी, अंदाजे १६ लाख लोकांचा मृत्यू अप्रत्यक्ष धूम्रपानाच्या संपर्कामुळे होतो. तंबाखूशी संबंधित आजारांमुळे अपंगत्व आणि दीर्घकाळ चालणारी, वेदनादायी आजारही होतात.

देशात दरवर्षी तंबाखूमुळे १३.५ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात, ज्यामध्ये धूम्रपान आणि अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे होणाऱ्या अंदाजे १२ लाख मृत्यूंचा समावेश आहे. धूरविरहित तंबाखूमुळे निर्माण होणाऱ्या जागतिक आरोग्य भारापैकी ७० टक्के भार भारताचा आहे. धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे दरवर्षी २,३०,००० हून अधिक भारतीयांचा मृत्यू होतो. भारतातील तोंडाच्या कर्करोगाची जवळपास ९० टक्के प्रकरणे धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे होतात. बिडी आणि सिगारेट ओढणारे लोक धूम्रपान न करणाऱ्यांपेक्षा ६ ते १० वर्षे लवकर मरतात. भारतातील कर्करोगाच्या एकूण प्रकरणांपैकी २७ टक्के प्रकरणे तंबाखूच्या वापरामुळे होतात. तंबाखू हा कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, फुफ्फुसांचे जुनाट आजार, पक्षाघात, वंध्यत्व, अंधत्व, क्षयरोग, तोंडाचे आजार आणि इतर अनेक आजारांसाठी एक अत्यंत धोकादायक घटक आहे. पुरुषांमध्ये ५० टक्के आणि महिलांमध्ये २० टक्के कर्करोगाची प्रकरणे तंबाखूमुळे होतात. तंबाखूमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला दरवर्षी अंदाजे ₹१७७३.४ अब्ज इतका फटका बसतो, जो देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या जीडीपी १ टक्क्या पेक्षा जास्त आहे.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाअंतर्गत तंबाखू मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. देशातील तंबाखू उद्योगाचा नियोजित विकास सुनिश्चित करणे, हा तंबाखू मंडळ अधिनियम, १९७५ चा उद्देश आहे. त्याच सरकारी वेबसाइटवरून मिळालेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या वर्षात भारतीय तंबाखू निर्यातीचे मूल्य १२,००५.८९ कोटी रुपयांवर पोहोचले. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले आहे. तंबाखू उद्योग २०२४-२०२५ मध्ये ४६ दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळाले, तसेच निर्यातीतून ₹१६,७२८.०२ कोटींचा महसूल मिळवले. भारतीय तंबाखूची १२७ देशांमध्ये निर्यातही केली जाते. भारत हा तंबाखूचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक आणि उत्पादक देश आहे. भारतीय तंबाखू उद्योगाचे मूल्य १.१६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, एकट्या सरकारलाच दरवर्षी तंबाखू उत्पादनांवरून कराच्या स्वरूपात ७६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई होते. 'निकोटिन अँड टोबॅको रिसर्च' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधानुसार, तंबाखूजन्य पदार्थांवर उत्पादन शुल्क म्हणून गोळा होणाऱ्या प्रत्येक ₹१०० मागे, तंबाखू सेवनामुळे समाजावर ₹८१६ चा आर्थिक भार पडतो. यावरून हे सिद्ध होते की तंबाखूचा वापर हा राष्ट्रीय तिजोरीवर एक मोठा आर्थिक भार आहे.

तंबाखू किंवा इतर कोणतेही व्यसन सोडण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपली स्वतःची इच्छाशक्ती. जर आपण दृढनिश्चयी असू, तर आपल्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक लोक आणि संस्था सेवेत उपलब्ध असतात. तंबाखू सोडल्याने खर्चिक आजार आणि वेदनादायी अकाली मृत्यू टाळता येतात. निर्व्यसनतेमुळे आपल्या शरीरातील अवयव अधिक कार्यक्षमतेने कार्य करू शकतात आणि गंभीर आजारांचा धोका कमी होतो. आरोग्यसेवेवरील खर्च कमी केल्याने, आपण आयुष्यातील इतर महत्त्वाच्या खर्चासाठी अधिक पैसे वाचवतो. तंबाखू सोडणे हे आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक आदर्श निर्माण करते. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी सरकारकडून सुविधाही उपलब्ध आहेत. देशातील विविध राज्यांसाठी तज्ञ समुपदेशकांद्वारे सर्व भाषांमध्ये दूरध्वनी मार्गदर्शन आणि समुपदेशन (टोल-फ्री १८०० ११ २३५६) प्रदान केले जाते. मोबाईलवर (क्रमांक ०११ २२९०१७०१) टेक्स्ट मेसेजद्वारे देखील समुपदेशन दिले जाते. व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्रे जिल्हा स्तरावर उपलब्ध आहेत. तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र किंवा जिल्हा तंबाखू नियंत्रण केंद्र लोकांना त्यांचे व्यसन सोडण्यास मदत करण्यासाठी मोफत वैद्यकीय समुपदेशन, वर्तणूक थेरपी आणि औषधोपचार पुरवते. आपण शहरभरातील अनेक स्थानिक विशेष वैद्यकीय सुविधा, सामुदायिक व्यसनमुक्ती केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये उपचार घेऊ शकतो. जीवनाचे मूल्य ओळखा, स्वतःची आणि आपल्या प्रियजनांची काळजी घ्या आणि आजच तंबाखू सोडा.

लेखक
डॉ. प्रितम भि. गेडाम
मोबाईल आणि व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक - ०८२३७४ १७०४१

## खासदार संजय जाधव यांची अंतरवाली सराटीत धाव; मनोज जारांगे पाटील यांच्या उपोषणस्थळी भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२९, परभणी :** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या मराठा आंदोलनाचे प्रमुख नेते मनोज जारांगे पाटील यांची परभणी लोकसभा मतदारसंघाचे खा. संजय (बंडू) जाधव यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी मनोज जारांगे पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस करत त्यांच्या संघर्षाला पाठिंबा दर्शविला. उपोषणस्थळी झालेल्या चर्चेदरम्यान खा. संजय जाधव यांनी मराठा समाजाच्या मागण्या रास्त असल्याचे सांगत शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली. समाजातील लाखो युवक, शेतकरी आणि कुटुंबांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या विषयावर कोणतीही विलंब न करता सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. मनोज जारांगे पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या आंदोलनाने राज्यभरातील मराठा समाजाला एकत्र आणले असून, शासनावर निर्णयासाठी दबाव वाढत आहे. अशा परिस्थितीत खा. संजय जाधव यांनी उपोषणस्थळी भेट देऊन व्यक्त केलेला पाठिंबा महत्त्वाचा मानला जात आहे.

यावेळी उपस्थित मराठा बांधवांनी मनोज जारांगे पाटील यांच्या त्याग, जिद्द आणि संघर्षाचे कौतुक करत मनोजदादा लढा, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत अशा घोषणा दिल्या. उपोषणस्थळी राज्याच्या विविध भागांतून आलेल्या समाजबांधवांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. खा. संजय जाधव यांनी शासनाला आवाहन करत म्हटले की, मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मनोज जारांगे पाटील यांचे उपोषण सन्मानाने सोडवावे.

# धोत्रे बुद्रुक ग्रामपंचायतीतील कोट्यवधींच्या विकासकामांमध्ये गैरव्यवहाराचा आरोप

## जलजीवन मिशन, १४ वा व १५ वा वित्त आयोगातील कामांची त्रयस्थ समितीकडून चौकशीची मागणी

### १५ दिवसांत कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील मौजे धोत्रे बुद्रुक ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजना, १४ वा व १५ वा वित्त आयोगातील विकासकामे, शिवपानंद रस्ते, आरोग्य उपकेंद्र तसेच विविध शासकीय योजनांतील निधीचा अपहार झाल्याचा दावा समितीने केला असून, याप्रकरणी त्रयस्थ समितीमार्फत सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार, सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, धोत्रे बुद्रुक ग्राम पंचायत अंतर्गत १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे. ग्रामपंचायत प्रशासन, ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून निकृष्ट दर्जाची कामे करत फक्त बिले काढून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ई-टेंडर प्रक्रियेदरम्यान शासन नियमांची पायमल्ली करण्यात आली. टेंडर प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने न राबवता मनमानीपणे इतर ठिकाणाहून टेंडर मंजूर करण्यात आले. काही कामांमध्ये आवश्यक प्रशिक्षण व तांत्रिक अटी पूर्ण न करताही कामे मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे.

ग्रामपंचायतीने घंटागाडीची गरज नसतानाही तिची खरेदी करून ती वापराविना उभी ठेवण्यात आली असून, शासन निधीचा अपव्यय करण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तसेच आरोग्य उपकेंद्रासाठी १५ व्या वित्त आयोगातून खर्च दाखवून पुन्हा त्याच कामासाठी निधी खर्च करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

शिवपानंद रस्त्यांच्या कामांबाबतही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. संबंधित रस्ते केवळ मस्टरवर मंजूर दाखवून प्रत्यक्षात जेसीबीद्वारे रस्त्याच्या कडेला मुरूम टाकण्यात आला. मात्र मुरूम-खडीचा योग्य वापर न करता, रोलर न फिरवता आणि दर्जेदार काम न करता फक्त कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून बिले काढण्यात आल्याचे समितीचे म्हणणे आहे. पंचायत समिती पारनेरमधील काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून ऑनलाईन माहितीही न भरता निधी उचलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय मजुरांनी प्रत्यक्ष काम न करता वयोवृद्ध व्यक्तींच्या नावावर मजुरी दाखवून रक्कम काढण्यात आल्याचे आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे रोजगार हमी आणि विकास योजनांमधील निधीचा अपहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे.

धोत्रे बुद्रुक व धोत्रे खुर्द या दोन्ही गावांसाठी यापूर्वी २ कोटी १४ लाख रुपयांची पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली होती. मात्र ही योजना निकृष्ट दर्जाची असून कागदोपत्री पूर्ण दाखवून बिले काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर २०२४-२५ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल ४ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. या योजनेतील अनेक कामे अद्याप अपूर्ण असतानाही मोठ्या प्रमाणावर बिले काढण्यात आल्याचा दावा समितीने केला आहे.

काही ठिकाणी जुन्या भारत निर्माण पाणी पुरवठा योजनेच्या सुविधांचा वापर करून नव्या जलजीवन मिशन योजनेची कामे दाखवण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे शासन निर्णय, प्लॅन इस्टीमेट आणि प्रत्यक्ष कामांची तुलना करून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत अंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या विविध विकास निधीतील जीएसटी रक्कम शासनाकडे भरली का, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शासन निधीचा अपहार झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निवेदनात नमूद आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ समितीमार्फत प्रत्यक्ष पाहणी करून १४ वा व १५ वा वित्त आयोग तसेच जलजीवन मिशनच्या सर्व कामांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित ठेकेदार, सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांवर १५ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास अन्याय निवारण निर्मूलन सेवा समिती व ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# पोंभूर्णा तालुक्यातील फुटाणा मोकासा येथील वादळग्रस्तांना तातडीने मदत द्या

## मृत व्यक्तीच्या कुटुंबाला त्वरित आर्थिक सहाय्य देण्याची आ.मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील पोंभूर्णा तालुक्यातील फुटाणा मोकासा येथे अवकाळी पाऊस आणि चक्रीवादळामुळे झालेल्या मोठ्या नुकसानीची गंभीर दखल घेत राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवून तातडीच्या मदतीची मागणी केली आहे. वादळामुळे घरांचे, शेतीचे आणि वीज यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त नागरिकांचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, कोसळलेले वीज खांब उभारून वीजपुरवठा पूर्ववत करावा तसेच या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या स्व. लहानूबाई नानुजी पाल यांच्या कुटुंबाला विशेष



आर्थिक सहाय्य व नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे.

यासोबतच आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनाही पत्र पाठवून पोंभूर्णा तालुक्यातील फुटाणा मोकासा येथे अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून प्रशासकीय प्रक्रिया गतिमान करून नुकसान भरपाई तत्काळ द्यावी,अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

आ. मुनगंटीवार यांनी पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, पोंभूर्णा तालुक्यातील फुटाणा मोकासा गावात २८ मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे अनेक घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही घरे अंशतः तर काही घरे पूर्णपणे पडली असून नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहेत. अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला असून ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झाले असल्याने प्रशासनाने तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन मदतकार्य सुरू करावे, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

या नैसर्गिक आपत्तीत स्व. लहानूबाई नानुजी पाल यांच्या घरावरील टीनाचे शेड कोसळून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने पाल कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

तसेच चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या घरांचे, शेतीचे व अन्य मालमत्तेचे त्वरित पंचनामे करून शासनाच्या निकषानुसार मदत वितरित करावी, कोसळलेले वीज खांब उभारून वीजपुरवठा पूर्ववत करावा आणि सर्व प्रभावित नागरिकांना शक्य ती मदत तत्काळ उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना संबंधित यंत्रणांना देण्याची विनंती ही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांच्याकडे केली आहे.

# समाजहितासाठी बारी समाजाची सकारात्मक पुढाकार बैठक संपन्न

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.३०, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** शिरसोली प्र.न. व शिरसोली प्र.बो. येथील सूर्यवंशी बारी पंच मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील वाढत्या अनिष्ट चाली-रीतींवर नियंत्रण आणण्यासाठी महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. समाजातील लग्नकार्य, साखरपुडा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वाढत चाललेल्या अनावश्यक खर्चिक व सामाजिकदृष्ट्या घातक प्रथांवर सखोल चर्चा करण्यात आली.या बैठकीत समाजामध्ये वेळेवर लग्न लावणे, वैदिक पद्धतीने एकाच वेळेत विवाह पार पाडणे, मेहंदी व प्री-वेडिंग शूट यांसारख्या नव्याने सुरू झालेल्या खर्चिक प्रथा बंद करणे, लग्नातील बॅनरबाजी थांबवणे, महिलांनी सार्वजनिक ठिकाणी फेटे बांधून नृत्य करण्यास मर्यादा ठेवणे, साखरपुडा सकाळी १२ वाजेच्या आत घेणे तसेच वाजंत्रीस वेळेचे बंधन ठेवणे अशा विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

समाजात साधेपणा, संस्कार आणि आर्थिक बचत यांचे महत्व टिकवण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील बारी समाज पंच मंडळांची एकत्रित बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रविवार, दिनांक ०७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिरसोली प्र.बो. येथील समाज मंगल कार्यालयात मोठ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी पारोळा, अमळनेर, चोपडा, यावल, रावेर, ऐनपूर, भुसावळ, सोयगाव, आमखेडा, शेंदुर्णी, पहूर, पहूर पेठ, कुऱ्हा आदी ठिकाणी बैठका घेण्यात आल्या असून बऱ्हाणपूर, बांभाडा, शहापूर व अंतुर्ली येथे दूरध्वनीद्वारे चर्चा करण्यात आली. बैठकीस रतन काटोले, चंद्रकांत अस्वार, लक्ष्मण नाईक, दिगंबर बारी, गिरीश वराडे, राजेश आंबटकर यांच्यासह सोयगाव व आमखेडा येथील समाज बांधव उपस्थित होते. तसेच आम खेडा तालुका बारी समाजाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ काशीराम फुसे, उपाध्यक्ष गजानन लक्ष्मण ढगे, सहसचिव मनोज रघुनाथ आगे, सचिव रामदास लाडूबा फुसे तसेच सोयगाव तालुका बारी समाजाचे अध्यक्ष हरिदास रामदास काटोले, उपाध्यक्ष राजेंद्र तुकाराम फुसे, सचिव गणेश पांडुरंग आगे, उपसचिव दत्तात्रय गोविंदा काटोले यांच्यासह विश्वनाथ आगे, शंकर ढगे, एकनाथ बोडखे, समाधान भाऊ आगे, राजेंद्र दामधर आदी मान्यवर उपस्थित होते. समाजामध्ये चांगल्या परंपरा टिकवून साधेपणा, संस्कार आणि एकोपा जपण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.



समाजहितासाठी एक सकारात्मक पाऊलसूर्यवंशी बारी समाजातील वाढत्या अनिष्ट व खर्चिक चालीरीतींवर नियंत्रण आणण्यासाठी शिरसोली प्र.न. व शिरसोली प्र.बो.पंच मंडळांनी एकत्र येऊन महत्वपूर्ण निर्णय प्रक्रिया सुरू केली आहे.समाजात साधेपणा, संस्कार, आर्थिक बचत आणि सामाजिक शिस्त टिकवण्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. लग्न समारंभ साधेपणाने व संस्कारपूर्वक व्हावेत, समाजात अनावश्यक दिखावा कमी व्हावा आणि पुढील पिढीला चांगले संस्कार मिळावेत हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.समाजाच्या हितासाठी घेतलेल्या या निर्णय प्रक्रियेस सर्वांनी सहकार्य करून एकजूट दाखवावी, ही नम्र विनंती.

**- एकजूट समाजाची ताकद आहे.**

# चंद्रपुरात माणुसकीला काळिमा फासणारी घटना!

## जन्मदात्या मातेनेच पोटच्या मुलांना विक्री करताना मातेसह दोन महिलांना अटक तर एक फरार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** पैशाच्या हव्यासापोटी स्वतःच्याच पोटच्या मुलांची विक्री करणाऱ्या निर्दयी मातेचे धक्कादायक कृत्य चंद्रपूरमध्ये उघडकीस आले आहे. दोन निरागस मुलांना प्रत्येकी दोन लाख रुपयांना विकल्यानंतर या महिलेने आपल्याच १५ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या नवजात बाळाचीही विक्री करण्याचा कट रचला होता. मात्र रामनगर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा भयंकर डाव उधळला गेला आणि संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश झाला. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेच्या पतीचे काही वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यानंतर तिची ओळख अजय फुलझेले याच्याशी झाली. दोघेही महिलेच्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीसह लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहू लागले. दरम्यान, आरोपीची वाईट नजर मुलीवर पडली आणि त्याने तिच्यावर अत्याचार केला. मुलगी गरोदर राहिल्यानंतर बदनामीच्या भीतीने अजय व आरोपी आईने तिला प्रसूतीसाठी नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये दाखल केले.

रुग्णालय प्रशासनाला संशय येऊ नये म्हणून त्यांनी पुरात सर्व कागदपत्रे वाहून गेली अशी खोटी कथा रचली व मुलीचे वय २० वर्षे सांगितले. मात्र वैद्यकीय तपासणीत डॉक्टरांना संशय आला. डॉक्टरांनी तात्काळ नागपूरच्या अजनी पोलिसांना माहिती दिली. अजनी पोलिसांनी 'झिरो एफआयआर' नोंदवून प्रकरण चंद्रपूर पोलिसांकडे वर्ग केले. रामनगर ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक अश्विनी वाकडे यांनी पीडित मुलीचा जबाब नोंदवला असता हा प्रकार केवळ लैंगिक अत्याचारापुरता मर्यादित नसून त्यामागे मोठे रॅकेट असल्याचा संशय आला. आरोपी आईला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता तिने यापूर्वी आपल्या ८ महिन्या च्या मुलाला कागजनगर तेलंगणा व अडीच वर्षीय मुलाला चंद्रपूर येथे प्रत्येकी दोन लाख रुपयांना विकल्याची कबुली दिली. तसेच अल्पवयीन मुलीच्या पोटी जन्मलेल्या नवजात बाळालाही ती विकण्याच्या तयारीत होती. या



प्रकरणी रामनगर पोलिसांनी आरोपी आईसह बाळ खरेदी करणाऱ्या दोन महिलांना अटक केली आहे. यातील एका महिलेला थेट तेलंगणा राज्यातील कागजनगर येथून तर दुसरीला चंद्रपूरमधून ताब्यात घेण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाचा मुख्य सूत्रधार अजय फुलझेले सध्या फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. चारही आरोपींविरुद्ध मानवी तस्करी प्रतिबंधक कायदा व पॉक्सो कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली रामनगरच्या पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके व सहायक पोलीस निरीक्षक अश्विनी वाकडे यांच्या पथकाने केली. फरार आरोपी अजय फुलझेलेच्या अटकेसाठी पोलिसांची पथके सातत्याने छापे टाकत आहेत. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून समाजमन सुन्न झाले आहे.

# ट्रॅक्टर विक्रीच्या आमिषाने १२ लाखांची फसवणूक; आरोपी अटकेत, ३६ लाखांचे दोन ट्रॅक्टर जप्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३०, राहुरी (अहिल्यानगर) :** ट्रॅक्टर विकत देण्याचे आमिष दाखवून दोन शेतकऱ्यांची तब्बल १२ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला राहुरी पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून ३६ लाख रुपये किमतीचे दोन जॉन डिअर कंपनीचे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी जावेद जाकीर शेख (वय २८, रा. पिंप्री अवघड, ता. राहुरी) तसेच साक्षीदार नितीन भाऊसाहेब कदम (रा. धामोरी, ता. राहुरी) यांना आरोपी चंद्रकांत तुकाराम लांडे (वय ४१, रा. लांडेवाडी, सोनई, ता. नेवासा) व इंद्रभान गोविंद शेंडगे (रा. गोणेगाव, ता. नेवासा) यांनी ट्रॅक्टर विकत देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार दोघांकडून प्रत्येकी ३ लाख रुपये रोख व ३ लाख रुपये धनादेशाद्वारे असे एकूण १२ लाख रुपये स्वीकारले. मात्र, ट्रॅक्टर न देता त्यांची फसवणूक केल्याचे



उघड झाले.या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) व ३(५) प्रमाणे १ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता.पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर विभागाचे सोमनाथ वाकचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने तपास सुरू ठेवला होता. गोपनीय माहितीच्या आधारे २७ मे २०२६ रोजी लांडेवाडी (सोनई) येथे सापळा रचून आरोपी चंद्रकांत लांडे यास ताब्यात घेण्यात आले.अटके दरम्यान आरोपीकडून अंदाजे १८ लाख रुपये किमतीचे प्रत्येकी असे दोन जॉन डिअर कंपनीचे ट्रॅक्टर व त्यास जोडलेली कृषी अवजारे जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ३६ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.दरम्यान, आरोपीने ट्रॅक्टर विक्रीचे आमिष दाखवून अन्य व्यक्तींचीही फसवणूक केली असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

अशा प्रकारे फसवणूक झालेल्या नागरिकांनी राहुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ट्रॅक्टर, वाहने किंवा अन्य वस्तूंच्या खरेदी-विक्रीसंदर्भात कोणत्याही प्रकारच्या भुलथापांना बळी पडू नये, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.सदर कारवाई पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अर्जुन दारकुंडे, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे व पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब शिरसाठ यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पंढरपूर तालुका पोलिसांची डिझेल चोरांवर मोठी कारवाई

## ८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** दिनांक २६ मे च्या रात्री पहाटे दोन वाजताच्या सुमारास तुंगत गावातील विशाल भोसले यांचे दहा चाकी ट्रक मधून एक जण ब्रीजा गाडीमध्ये डिझेलचे ड्रम ठेवून दुसरे दोन जण फायबरच्या पाईपच्या साह्याने ट्रक मधून डिझेल चोरी करून तीन ड्रम डिझेल चोरी केला त्यानंतर ट्रकचा मालक विशाल भोसले यास संशय आल्यानंतर ब्रिझा गाडीचा पाठलाग केला.

त्याच्यानंतर ती गाडी गुरसाळे बायपासला आल्यानंतर त्या ठिकाणी समाधान गुटाळ याचे हॉटेल समोर असलेल्या गाडीच्या बाजूला लावून त्या ठिकाणी देखील ब्रिजा गाडीमधून दोघेजण खाली उतरून एक जण प्लास्टिकची पाईप तेथील ट्रकच्या गाडीला लावून डिझेलचे टाकीतून डिझेल चोरी करत असताना आरडाओरडा केल्याने तिथून दोघे पळून गेले आणि एका व्यक्तीला लोकांनी पाठलाग करून पंढरपूर तालुका पोलिसांना याची माहिती दिली.

पंढरपूर तालुका पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन चोरी केलेले डिझेल



ब्रिजा कार व तीन मोबाईल फोन असा एकूण तीन ड्रम डिझेल सह मुद्देमाल एकूण किंमत रुपये आठ लाख ३५००० चा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतलेला असून आरोपी दत्तात्रय महारुद्र लोहार राहणार मोहोळ तालुका मोहोळ याचे विरुद्ध व त्याचे इतर दोन साथीदार याचे विरुद्ध बी.एम.एस.ऍक्ट कलम ३०३ प्रमाणे डिझेल चोरीचा गुन्हा दाखल केलेला असून

आरोपी दत्तात्रय महारुद्र लोहार या सदर चोरीच्या तपास कामी ताब्यात घेण्यात आलेले आहे व इतर पळून गेलेल्या दोन आरोपींचा पंढरपूर तालुका पोलीस मोहोळ भागात शोध घेत आहेत. मागील २ महिन्यात तुंगत गुरसाळे रोडवर डिझेल चोरीच्या अनेक घटना घडलेल्या होत्या त्या बाबतीमध्ये सदर कारवाईतून आणखीन डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय मुजावर सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे शहाजी गोसावी पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे भारत भोसले दत्तात्रय तोंडले ASI विजू गायकवाड पोलीस हवालदार जाडकर नितीन चौरे सुजित उबाळे पोलीस हवालदार साळुंखे संजय गुटाळ मंगेश रोकडे पोलीस हवालदार योगीराज खिलारे सुहास देशमुख दीपक भोसले अभिमन्यू गरड यांच्या पथकाने केली आहे.

# थोडक्यात

## नगराध्यक्ष चौधरी ची अनधिकृत टप्प्यांवर धडक कारवाई; रिक्षा स्टॅन्ड ने घेतला मोकळा श्वास



**अक्षराज: चंद्रकांत सुतार**

**दि.३०, माथेरान :** मागील २ ते ३ वर्षांपासून दस्तुरी ते टपाल पेटी नाक्यापर्यंत जागोजागी अनधिकृतपणे टपऱ्या लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र विद्रुपीकरण पहावयास मिळत आहे. पावसाळ्यात याच टपऱ्यांवर प्लास्टिक टाकण्यात येते त्यामुळे आपण एखाद्या ग्रामीण भागात आलो आहोत की काय असा भास पर्यटकांना झाल्याशिवाय राहत नाही. दिवसेंदिवस अशाप्रकारे वाढत्या टपऱ्या आगामी काळासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. इथले पर्यावरण त्याचप्रमाणे झाडी नष्ट होण्यास कारणीभूत ठरू शकतात. ही बाब ओळखून नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी दि.२८ मे २०२६ रोजी सायंकाळी स्वतः दस्तुरी येथील ई रिक्षा स्टँडवरील सर्व अनधिकृत टपऱ्या काढून टाकल्या आहेत. त्यामुळे रिक्षा स्टँड भोवती जो काही टपऱ्याचा गर्हाडा निदर्शनास येत होता तो काहीअंशी का होईना दूर करण्यात आला असूच ई रिक्षा स्टँडने मोकळा श्वास घेतला आहे. बहुतेक टपरी धारक हे परिसरातील असून काही वर्षांपूर्वी इथे स्थानापन्न झालेले आहेत. दस्तुरी पासून ते टपाल पेटीच्या नाक्यापर्यंत सर्वत्र ह्या टपऱ्या वाढत चाललेल्या आहेत. ई रिक्षा स्टँड ते अमन लॉज स्टेशन पर्यंत संपूर्ण रस्ता मोकळा झाल्यास पर्यटकांना, नागरिकांना चालणे सुलभ होऊ शकते. बाजारपेठ मधील मुख्य रस्त्यावरील सुध्दा जी काही हॉटेल धारकांनी विद्रुपीकरण केलेली आहेत ती सुद्धा वेळीच काढून टाकल्यास संपूर्ण भाग सुंदर आणि स्वच्छ राखण्यासाठी नगरपरिषदेला मदत होऊ शकते असे नागरिक बोलत आहेत.

शासकीय अधिकारी वर्ग नियमितपणे दस्तुरी पासून आरामात ई रिक्षांची सुविधा उपभोगून येत असतात.परंतु डोळ्यासमोर दिसत असून सुद्धा ही अनधिकृत कामे हटविण्यास दिरंगाई करत होते. केवळ पगारापूरते कामे करणारी काही अधिकारी मंडळींची जबाबदारी असताना देखील बघ्याची भूमिका बजावत होते. अखेरीस स्वतः नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी ही अनधिकृत कामे दूर केली आहेत.

## कर्जतच्या ६ वर्षीय नहुष बोराडेची क्रिकेटमध्ये एंट्री



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.३०, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुक्यातील एकसळ गावातील ६ वर्षीय होतकरू क्रिकेटपटू नहुष मंगेश बोराडे याने आपल्या क्रिकेट कौशल्याच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. भारताचा यशस्वी कर्णधार रोहित शर्मा याला घडविणारे प्रसिद्ध प्रशिक्षक दिनेश लाड यांच्या दिनेश लाड क्रिकेट फाऊंडेशनमध्ये नहुषची निवड झाली असून, त्याच्या क्रिकेट कारकिर्दीसाठी ही मोठी संधी मानली जात आहे.एकसळसारख्या ग्रामीण भागातील छोट्या गावात राहत असून नहुषने अल्पवयातच आपल्या खेळाची छाप पाडली आहे. त्याच्या जिद्द, मेहनत आणि क्रिकेटप्रती असलेल्या प्रचंड आवडीमुळे त्याची फाउंडेशनतर्फे निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील अनेक गुणवंत खेळाडूंना आर्थिक अडचणींमुळे योग्य संधी मिळत नाही. मात्र, अशा परिस्थितीत दिनेश लाड क्रिकेट फाउंडेशनने नहुषला दिलेला आधार प्रेरणादायी ठरत आहे.फाऊंडेशनतर्फे नहुषच्या पुढील शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्यात येणार असून त्याला व्यावसायिक क्रिकेट प्रशिक्षण, खेळ साहित्य, आवश्यक उपकरणे तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक मदत दिली जाणार आहे. त्याचबरोबर व्यक्तिमत्व विकास आणि मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाणार आहे. शार्दुल ठाकूर यांच्यासारखे क्रिकेटपटू घडवणारे प्रशिक्षक दिनेश लाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणारा वायएससीसी अकॅडमीचा नहुष हा पहिलाच खेळाडू ठरला आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## परिवहन मंत्री सरनाईक यांची वडखळ एसटी बसस्थानकाला अचानक भेट



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.३०, पेण (रायगड) :** महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कोकण दौऱ्यादरम्यान वडखळ येथील एसटी बसस्थानकाला अचानक भेट देत तेथील प्रवासी सुविधा, स्वच्छता व एकूण व्यवस्थेची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी बसस्थानकावर उपस्थित प्रवाशांशी थेट संवाद साधून बसेस वेळेवर येतात का, उपलब्ध सुविधा समाधानकारक आहेत का, तसेच स्वच्छतेबाबत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. बसस्थानकातील प्रतीक्षालय, तिकीट व्यवस्था आणि इतर सुविधांची पाहणी केल्यानंतर त्यांनी प्रसाधनगृहांचीही प्रत्यक्ष तपासणी केली.

प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेबाबत असमाधान व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच बसस्थानक परिसरात नियमित स्वच्छता राखण्यासाठी दक्षता घेण्याचे आदेश ही त्यांनी दिले. यावेळी राज्यभरात १ जूनपासून राबविण्यात येणाऱ्या ७८ हजार वृक्ष लागवड अभियानाचाही उल्लेख करण्यात आला. वडखळ बसस्थानक परिसर अधिक हिरवागार व प्रवाशांसाठी सुखद बनविण्याच्या उद्देशाने संरक्षण भिंतीलगत सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्याचे निर्देशही परिवहन मंत्र्यांनी दिले.

याप्रसंगी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सेवा मिळावी, तसेच प्रत्येक बसस्थानक हे प्रवासीहिताचे आदर्श केंद्र बनावे, यासाठी शासन कटिबद्ध असून याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.परिवहन मंत्र्यांच्या अचानक भेटीमुळे बसस्थानक प्रशासनात चांगलीच धावपळ उडाली असून, प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे.